| MHAU060012512023 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल ता. | : | १२/०६/२०२३ |
| | नोंदणी ता. | : | १२/०६/२०२३ |
| | निकाल ता. | : | २४/०३/२०२६ |
| | कालावधी : ०२ व. ०९ म. १२ दि. | | |

**कन्नड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी विनायक द. पाटील)**

संक्षिप्त फौजदारी खटला क्रः ४२१/२०२३

निशाणः १६

**फिर्यादी:**

गायकवाड कृषी सेवा केंद्र

प्रो.प्रा.सुधाकर पुंजाराम गायकवाड

वयः३४ वर्ष धंदा–व्यापार

रा.देवगांव रंगारी, ता.कन्नड जि.औरंगाबाद

**विरुद्ध**

**आरोपी:**

विकास विश्वनाथ डोळस

वयः४० वर्ष धंदा–शेती

रा.देवगांव रंगारी, ता.कन्नड जि.औरंगाबाद

---

## परक्राम्य दस्तावेज अधिनियम १८८१ मधील कलम १३८ अन्वये फिर्याद

---

फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.जे.काळे

आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. मगर

---

## न्यायनिर्णय

## (घोषित तारीख : २४/०३/२०२६)

**फिर्यादीची बाजुः–**

फिर्यादी याचे शेतीचे औषधे, खते, बियाणे इत्यादी खरेदीविक्री करण्याचे उपजिविकेचे साधन आहे. आरोपी हा फिर्यादीचा खूप जुना मित्र आहे. तो फिर्यादीकडून बि–बियाणे खरेदी करुन घेत होता. त्यांच्यादरम्यान ब–याच वेळा व्यवहार झालेले होते. अशा परिस्थितीत आरोपी याने यापूर्वी घेतलेल्या बि–बियाणे, औषधे, रसायणे खताबाबत फिर्यादीने पैसे मागितले.मात्र, आरोपीने टाळाटाळ केली. त्यामुळे, रक्कम १,९५,०००/– रुपये इतकी रक्कम देण्याकरीता आरोपीने दि.३१.११.२०२३ रोजीचा धनादेश फिर्यादी यांना गायकवाड कृषी सेवा केंद्र देवगांव रंगारी यांच्या नावे दिला. सदर धनादेश आरोपीचे खाते क्रमांक २०२८८४४५३३० शाखा भारतीय स्टेट बँक लासूर स्टेशन, तालुका गंगापूर येथील होता. सदर धनादेशाचा क्र.४१५६२७ असा होता व तो दि.३१.११.२०२३ रोजीचा होता. फिर्यादीने सदरचा धनादेश

वटण्यासाठी दाखल केला असता खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे दि.२६.०४.२०२३ सदर धनादेश अनादरीत झाला. त्यामुळे, फिर्यादी याने वकिलांमार्फत दि.०८.०५.२०२३ रोजी नोटीस पाठविली आणि पैशाची मागणी केली. मात्र, दि.१६.०५.२०२३ रोजी सदर नोटीस आरोपीने न घेतल्याने परत आली. त्यामुळे, आरोपीने फिर्यादीला त्याचे पैसे दिले नाही. सबब, आरोपी हा फिर्यादीचे कायदेशीर देणे लागत असताना देखील त्याने रक्कम न दिल्याने आणि त्या पोटी दिलेला धनादेश अनादरीत झाल्यामुळे प्रस्तुत खटला दाखल केला.

२. या कामी आरोपीला आरोपांचा आशय निशाणी १० येथे वाचून दाखविला असता त्याने गुन्हा नाकबुल असल्याचे सांगितले. सबब, या खटल्याची संपरिक्षा घेण्यात आली. या कामी फिर्यादीने स्वतःचा पुरावा दिलेला आहे. याकामी वादातील धनादेश व तद्अनुशंगीक कागदपत्र सादर केलेली आहे.

३. तद्नंतर, आरोपी याच्यामार्फत परक्राम्य दस्तऐवज अधिनियम, १८८१ मधील कलम १४५ नुसार फिर्यादीचा उलटतपास घेण्यासाठी कोणताही अर्ज देण्यात आलेला नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया सहिंता, १९७३ मधील कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविला आहे. सदर जबाबात त्याने फिर्यादीच्या संपुर्ण पुराव्याचे खंडण केले आहे आणि त्याला पुरावा द्यायचा आहे असे सांगितलेले आहे. मात्र, आरोपी न्यायालयासमक्ष हजर राहिलेला आहे मात्र, त्याने कोणतीही तजवीज केलेली नाही. प्रस्तुत खटला

दि.१८.१२.२०२५ पासून पुराव्याकरीता नेमण्यात आलेला होता. मात्र, इतका प्रदीर्घ कालावधी देवून देखील आरोपी याच्याकडून उलटतपास घेण्यात आलेला नाही किंवा अन्य कोणताही अर्ज करण्यात आलेला नाही.

४. एकंदरीत परिस्थितीत माझे समक्ष खालील मुद्दे उपस्थित राहातात.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | फिर्यादी असे सिद्ध करतो का की आरोपी त्याचे कायदेशीररित्या अंमलबजावणी योग्य कर्ज देणे लागतो काय? | होकारार्थी |
| २. | आरोपीने परक्राम्य दस्तऐवज कायद्याचे अंतर्गत कलम ११८ व १३९ मधील गृहितकांना खंडीत केल्याचे सिद्ध केले का? | नकारार्थी |
| ३. | आरोपीने परक्राम्य चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे अंतर्गत कलम १३८ अन्वये गुन्हा केलेला आहे का? | होकारार्थी. |
| ४. | काय आदेश? | आरोपीला तीन महिने कारावास व दंड करण्यात येतो. |

## –: का र ण मि मां सा:–

## पुरावा

५. या कामी फिर्यादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. वादातील धनादेश बँकेत जमा केल्याची पावती, धनादेश, धनादेश परत आल्याचा मेमो, वकिलांमार्फत पाठविलेली नोटीस, पोस्टाची पावती आणि त्याचा लखोटा व पोस्टाचा अहवाल दाखल केलेला आहे.

## युक्तिवाद

६. फिर्यादी यांचे विधीज्ञ यांनी थोडक्यात असा युक्तिवाद केलेला आहे की आरोपी हा फिर्यादीचे कायदेशीर देणे लागतो ही बाब फिर्यादीने निर्विवादपणे प्रस्थापित केलेली आहे. आरोपी याने कोणताही बचाव मांडलेला नाही. त्यामुळे, त्याच्याविरुध्द गुन्हा शाबीत होतो.

## मुद्दा क्र. १ ते ३ बाबत

७. पराक्रम्य दस्तऐवज कायद्याचे अंतर्गत पुराव्याचे अवलोकन करत असताना सदर परक्राम्य दस्तऐवज कायद्यातील कलम १३९ व ११८ अन्वये असणारे गृहीतक महत्वाचे आहे. या अनुषंगाने मा. सर्वाच्च न्यायालयाने रंगप्पा वि. मोहन ए.आय.आर. २०१० सुप्रिम कोर्ट पान नं. १८९८ या न्यायनिर्णयामध्ये असे सांगितलेले आहे की, फिर्यादीला परक्राम्य दस्तऐवज कायद्याचे कलम १३९ मधील गृहितकाचा फायदा असून 'रिव्हर्स ओनस' या

तत्वानुसार आरोपी हा परक्राम्य दस्तऐवज कायद्याचे कलम ११८ व १३९ अन्वये असणा–या गृहितकांना खंडीत केले आहे का हे पाहणे गरजेचे आहे.

८. या कामी फिर्यादीने आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून त्यातील मजकुर हा फिर्यादमधील मजकुराप्रमाणेच आहे. त्यामुळे, मी त्याची पुनरावृत्ती येथे टाळतो. फिर्यादीचे पुराव्याचा थोडक्यात सार सांगायचे म्हणजे फिर्यादी आणि आरोपी यांच्यामध्ये मैत्री होती. फिर्यादीच्या दुकानातून आरोपी हा शेती उपयोगी साहित्य विकत घ्यायचा. त्याबाबतची रक्कम आरोपीने दिलेली नव्हती. त्या रकमेची मागणी वेळोवेळी फिर्यादीने आरोपीकडे केली असता आरोपीने केवळ टाळाटाळ केली. आरोपीने त्या रकमेच्या पोटी शेवटी वादातील धनादेश दिला. मात्र, तो धनादेश खात्यावर पुरेशी रक्कम नसल्यामुळे तो अनादरीत झाला. फिर्यादीने त्याच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांचा उल्लेख केलेला आहे. तसेच, सदर कागदपत्रांना गृहितक असल्यामुळे त्यांच्या अस्थित्व प्रस्थापित होते.

९. सबब, आरोपीने आपल्या खात्यात पुरेशी रक्कम नसताना वादातील धनादेश फिर्यादीला दिला. फिर्यादीने आरोपीला नोटीस पाठवून देखील त्याने ती स्विकारलेली नाही. तदनंतर कायद्यात अपेक्षित असणा–या कालावधीकरीता फिर्यादीने वाट पाहून प्रस्तुत फिर्याद दाखल केलेली आहे. एकंदरीत परिस्थितीमध्ये परक्राम्य दस्तऐवज अधिनियम १८८१ मधील कलम १३८ खालील गुन्हयासाठी असणारे कलम १३९ व ११८ मधील गृहितक आरोपी हा खंडीत करु शकलेला नाही. त्यामुळे, आरोपी हा फिर्यादीस

कायदेशीर अंमलबजावणी योग्य देणे लागतो असे सिद्ध होते. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देतो तर मुद्दा क्र. २ यांचे उत्तर नकारार्थी देतो.

१०. सबब, आरोपीने फिर्यादीस वादातील रक्कम देण्यासाठी धनादेशदिला, मात्र तो धनादेशपुरेषी रक्कम खात्यामध्ये नसल्यामुळे अनादरीत झाला असे प्रस्थापित झाल्यामुळे त्याने परक्राम्य दस्तऐवज कायद्याचे कलम १३८ अन्वये आरोपीने गुन्हा केलेला आहे असे प्रस्थापित होते. त्यामुळे, मी मुद्दा ३ चे उत्तर होकारार्थी देतो.

**मुद्दा क्र. ४ बाबत**

११. आरोपीविरुध्द गुन्हा सिद्ध झाल्यामुळे त्याला शिक्षेबाबत ऐकणे मला आवश्यक वाटते. मात्र, खटला संक्षिप्त स्वरुपाचा असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेतील तरतुदीप्रमाणे आरोपीला शिक्षेबाबत ऐकणे सक्तीचे नाही. विशेष म्हणजे आरोपी आजदेखील न्यायालयात हजर होता. त्याला या प्रकरणाबाबत काय तजवीज करणार आहे याची विचारण केली असता तो स्पष्ट उत्तरे देत नाही. तो न्यायालयातून बाहेर गेला त्याला पुन्हा पुकारले असता तो हजर राहत नाही. त्यामुळे, आरोपीला या प्रकरणाचे गांभीर्य नाही असे दिसून येते. आरोपी याला विधिज्ञांचे प्रतिनिधित्व असूनदेखील तो कोणतीही तजवीज करत नाही. त्यामुळे, आरोपी स्वतःहून प्रकरणापासून अलिप्त राहत असल्यामुळे त्याला शिक्षेबाबत ऐकणे गरजेचे वाटत नाही.

१२. उपरोक्त परिस्थितीमध्ये या प्रकरणाची एकंदरीत परिस्थिती पाहिली असता आरोपी याने फिर्यादी परतफेड पोटी दिलेला धनादेश अनादरीत

झालेला आहे. त्यामुळे, आरोपीने फिर्यादीला देय असलेले कायदेशीर देणे तो देवू शकला नाही असे तथ्य प्रस्थापित होते. यामुळे फिर्यादीला नुकसान झाले आहे. प्रस्तुत कायदा हा लोकांमधील आर्थिक व्यवहाराची वृध्दी करण्यासाठी करण्यात आलेला आहे. मात्र, आरोपीच्या एकंदरीत वागण्यातून त्याने धनादेश देवून त्याचा गैरवापर केल्याचे व फिर्यादीला त्याचे हक्काच्या पैसापासून वंचित ठेवल्याचे प्रस्थापित होते. अशाप्रकारे पैसे घेवून त्याची परतफेड न करणे हे चांगले लक्षण नसून त्यामधून समाजामध्ये चुकीचा संदेश जात आहे. प्रस्तुत प्रकरण चालू असेपर्यंत आरोपीने रक्कम परतफेड करण्याचा कोणताही प्रयत्न केलेला दिसून येत नाही. सबब, आरोपी हा कोणत्याही परिणामाचा विचार न करता किंवा त्याला न घाबरता कृती करतो असे दिसून येते. सबब, या कारणामुळे मी त्याला अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ च्या तरतुदी अंतर्गत मुभा देणे योग्य मानत नाही.

१३. आरोपीची एकंदरीत वागणूक आणि या प्रकरणातील तथ्य पाहता त्याला केवळ दंडावरती मुक्त करावे असे देखील न्यायोचित ठरणारे नाही. मात्र, या प्रकरणातील धनादेशाची रक्कम विचारात घेवून शिक्षेची मर्यादा ठरवावी लागणार आहे. आरोपीचा हा पहिलाच गुन्हा आहे. सबब, या प्रकरणातील धनादेशाची रक्कम ही रुपये १,९५,०००/-आहे. या ठिकाणी आरोपीची परिस्थिती पाहता त्याला ३ महिन्याची कारावास शिक्षा देणे मला उचित वाटते. या प्रकरणातील रक्कम पाहता फिर्यादीने आरोपीला सदर धनादेश ३१/०१/२०२३ रोजी दिल्याचे दिसून येते. सबब, तेव्हा पासून ते

आजतगायत सदर रक्कम आरोपीकडेच अडकून आहे. सदर रक्कम त्या कालावधीसाठी फिर्यादीने इतरत्र गुंतविली असती तर त्याबाबतचे व्याज मिळाले असते. अशा परिस्थितीत सदर कालावधीसाठी मा.सर्वोच्च न्यायालय यांनी आर.विजयन वि. देबी २०१२ (१) एस.एस.सी. पान नं.२६० मधील दिलेल्या न्यायनिवाड्यात फिर्यादीला रकमेची परतफेडीसाठी ९ टक्के व्याज दराने हिशोब करावा असे निर्देष दिलेले आहेत. सबब, त्याप्रमाणे हिशोब केला असता फिर्यादीला अंदाज ९ टक्के व्याजाने रुपये ५०,०००/– रुपये व्याज मिळाले असते. सबब, सदर व्याजाची रक्कम दंडाच्या कामी विचारात घेणे आवश्यक आहे. सबब अशी व्याजासहित दंडाची रक्कम ही रुपये. २,४५,०००/– इतकी होते. अशी रक्कम आरोपीने फिर्यादीला देणे मला न्यायोचित वाटते. सदरची रक्कम ही या गुन्ह्याच्या कामी होणा–या दंडाच्या रकमेमधून दिली जाणे शक्य असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७(१) प्रमाणे ही रक्कम आरोपीला द्यायला सांगता येईल. प्रस्तुत प्रकरणामध्ये घेण्यात आलेला पुरावा हा सखोल स्वरुपाचा असल्यामुळे परक्राम्य दस्तऐवज कायदा अधिनियम चे कलम १४३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणात ५,०००/– रुपयांपेक्षा जास्त दंड जरी केला तरी कोणतीही बाधा दिसून येत नाही.

१४. त्याचबरोबर फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३५९ अन्वये या खटल्याचा खर्च म्हणुन झालेली रक्कम देखील आरोपीने फिर्यादीला देणे मला गरजेचे वाटते. त्या रक्कमेपोटी ५,०००/– इतकी रक्कम मला उचित वाटते. सबब, मुद्दा क्र.४ करीता मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(२) नुसार, परक्राम्य दस्तऐवज कायद्याचे कलम १३८ अन्वये ठेवणेत आलेल्या आरोपात दोशी ठरावून ३ महिन्याची साधा कारावास व रक्कम रुपये २,४५,०००/- इतका दंड ठोठावण्यात येतो.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७ (१) प्रमाणे सदर दंडाची रक्कम नुकसान भरपाई म्हणून फिर्यादीला देण्यात यावी. आरोपीने रक्कम ३० दिवसाच्या आत भरावी. रक्कम न भरल्यास ३० दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा भोगायची आहे.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५९ अन्वये आरोपीने फिर्यादीला या खटल्याचा खर्च म्हणुन ५०००/- रुपये इतकी रक्कम दयायची आहे. आरोपीने तशी रक्कम ३० दिवसाच्या आत भरावी. तशी रक्कम न भरल्यास १५ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा भोगायची आहे.

४. आरोपी याची वैयक्तिक बंधपत्रे आणि जामीनपत्रे समर्पित करावीत.

५. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये

आरोपीने जामिनकदबा द्यावा.

६. आरोपीला त्याचा अपिलाचा अधिकार कळविण्यात आला. आरोपीला  या न्यायनिर्णयाची प्रत मोफत देण्यात यावी.

(सदरचे निकालपत्र फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ३५३(१)(क) नुसार जाहीर करण्यात आले.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.03.24 16:10:38 +0530

(श्री वि.द. पाटील)

दि.२४.०३.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कन्नड